# ल्पकार प्रमोद कांबळे

अनंत कुलकर्णी

द्ध शिल्पकार श्री. प्रमोद कांबळे यांच्याशी गप्पा रत असताना त्यांनी अनेक गमतीदार आठवणी ांगितल्या. काही किस्सेही सांगितले, ज्यामधून सारखं बरंच काही होतं. त्यांच्याच शब्दांत काही प्रसंग इथे दिले आहेत.

लेसाठी वेळ, जागा किंवा इतर कोणतीही बंधनं ाकत नाहीत

ज्या वेळी मी मुंबईला होतो त्या वेळी घरची ःथेती फार चांगली नव्हती. त्यामुळेच मी ठरवलं , की पुढलं शिक्षण घेईन ते स्वतःच्या पैशानेच. ाण आणि व्यवसाय यांचा ताळमेळ साधताना डी कसरत करावी लागली, परंतु थोड्या दिवसांनी ाची सवय झाली. या कलेचा अभ्यास महत्त्वा होता, परंतु त्यासाठी पाहिजे तेवढा वेळ मिळत व्हता. म्हणून वेगळ्या पद्धतीने मी याचा अभ्यास रू लागलो. पिशवीमध्ये एक मातीचा गोळा घेऊन मुंबईमधील वेगवेगळ्या बस स्टॉपवर मी जाऊन बसत असे. पिशवीतून मातीचा गोळा काढून समोर दिसेल त्या माणसाचं पोर्ट्रेट बनवू लागलो. यामधून कमीत कमी वेळात पोर्ट्रेट बनविण्याचं कसब माझ्या अंगी आलं. सर्व बंधनं झुगारून मी हे काम करत असे. माझ्यासाठी कला महत्त्वाची होती. याचा पुढे मला फारच चांगला फायदा झाला. थम्सअपसाठी अनेक चांगले आर्टिस्ट असूनदेखील माझं पोर्ट्रेट सिलेक्ट झालं. यावरून माझ्या लक्षात आलं, की कलाकाराला आपली कला दाखविण्यासाठी जागा, वेळ अशी कोणतीही बंधनं नसतात.

*चित्रकला व शिल्पकला यांमध्ये अभ्यास महत्त्वाचा

ज्या वेळी माझ्याकडे एखादं चित्र अथवा शिल्प बनविण्यासाठी येतं त्या वेळी मी ते लगेच बनवण्यासाठी हातामध्ये घेत नाही. खरं पाहता चित्रकला, शिल्पकला किंवा कोणतीही कला असो, त्यामध्ये अभ्यास महत्त्वाचा. उदाहरण म्हणून सांगतो. चित्रकूटमधील 'नन्ही दुनिया'मधील प्राणी बनविण्यासाठी नानाजी देशमुखानी माझ्यासमोर प्रस्ताव मांडला. नानाजींचा प्राण्यांच्या बाबतीतला अभ्यास चांगला होता. त्यांनी माझ्यासमोर प्रस्ताव मांडणं हे माझ्यासाठी अभिमानास्पद होतं. सर्वप्रथम मी त्यांच्याकडून काम समजावून घेतलं व त्यांना ज्या पद्धतीने प्राणी हवे होते त्या प्राण्यांबद्दल पुस्तक, इंटरनेट किंवा उपलब्ध असलेल्या मार्गांनी माहिती मिळवली आणि त्यानंतर अथक परिश्रमांनी 'नन्ही दुनिया' साकार झाली. ती एवढी सुंदर झाली, की उद्घाटनाच्या दिवशी खुद्द राष्ट्रपती १५-२० मिनिटं माझ्याशी बोलले. हे जे फळ मिळालं ते केलेल्या अभ्यासामुळेच. प्रत्येक चित्र किंवा शिल्प करताना मूलभूत आवश्यकता आहे त अभ्यासाची. माझ्यासमोर एखादं शिल्प तयार करण्याचं वेळ येते त्या वेळी मी आधी त्या माणसाचा, त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सखोल अभ्यास करतो. तो माणूस दिस कसा, राहणीमान कसं आहे, तो कोणत्या भागामध्ये राहतो- याव्यतिरिक्त त्या माणसाचा स्वभाव कसा अ त्याप्रमाणे निश्चित केल्याप्रमाणे त्यामध्ये रंग भरतो. त्यामुळे चित्र आणखी जिवंत वाटतं.

*चित्र/शिल्प काढताना संपूर्ण तयारीनिशी काम

चित्र काढताना लागणारी सामग्री जवळ असणं आवश्यक आहे. पेन्सिल स्केच करण्यासाठी 2B, अशी पेन्सिल वापरावी. पेन्सिलला टोक असणं : आहे. चित्रकलेची सुरुवातच पेन्सिलला टोक क करायचं इथपासून होते. चित्र काढण्यासाठी तुम ड्रॉइंग पक्कं असावं लागतं. नित्य सराव आवश्य एखादं चित्र काढण्यासाठी आधी त्या स्केचबद्द काही आठवत असेल ते कागदावर लिहावं व साकारावं. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे सौंदर्यदृष्टी महत्त्वाचं. एकाच मटेरियलला वेगवेगळा फी आला पाहिजे. रंगसंगती आवश्यक आहे. नि आकलन महत्त्वाचं. आपल्या आजूबाजूला याबद्दल जागरूकता असणंही गरजेचं आहे

लहानपणी गणपतीचे शिल्प आणि रंगकाम यांची फारच आवड होती. एका कारखान्याबाहेर ते तासनतास काम बघत उभे रहात असत. कारखान्यातील माणसं त्यांना हाकलून देत. त्यां माणसांना कल्पनाही नव्हती की आपण ज्याला हाकलून देत आहोत, तो भविष्यातील मोठा शिल्पकार आहे!



*आपण वापरत असलेल्या साधनसामग्रीवर प्रेम करावं

ज्या वस्तूंना आपण प्रेम देतो त्या वस्तू आपल्याला चांगली साथ देतात. त्याचप्रमाणे मी ज्या वेळी एखादं चित्र काढतो अथवा शिल्प तयार करतो किंवा इतर काही काम हातात घेतो, मग ते पत्रिका बनवायचं असो किंवा साधं पाकीट बनवायचं असो, सर्वप्रथम मी त्यासाठी ज्या वस्तूंचा वापर होतो त्यांना प्रेम देतो. उदा. चित्र काढताना त्यावरून प्रेमाने हात फिरवतो. पेन्सिल योग्य ठिकाणी ठेवतो. शिल्पकलेला लागणाऱ्या मातीचा वास घेतो. अशा प्रकारे त्या वस्तूंशी ट्यून झाल्यामुळे माझं काम अधिक सुंदर होतं. मी फक्त चित्र अथवा शिल्प बनवत नाही, तर ते फील करतो.

*कलेमध्ये सराव महत्त्वाचा आणि हार्डवर्कला तर पर्याय नाही, तसंच कलेला वाहून घेणं आवश्यक

पं. भीमसेन जोशी ज्याप्रमाणे गाण्याचा सराव करतात, तीच बाब चित्रकला व शिल्पकला यांच्या बाबतीत लागू पडते. दररोज एक तरी चित्र काढण्याचा सराव झालाच पाहिजे. आणि फक्त सराव असून भागत नाहीत, तर हार्ड वर्क महत्त्वाचं. एका रात्रीत कुणी कलाकार बनत नाही. अनेक वर्षं अखंडित काम केल्यानंतर आपल्याला अपेक्षित फळ प्राप्त होतं. झोपेतही कलेचेच विचार असले पाहिजेत. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे त्या कलेमध्ये स्वत:ला वाहून घ्यायला हवं . मला चांगलं आठवतंय, सिनेमाच्या पोस्टरचं काम माझ्याकडे आलं होतं. पहिलं मोठं काम मला मिळालं होतं. त्यामध्ये मी इतका बुडून गेलो होतो, की ते काम करताना माझ्या सख्ख्या बहिणीचं लग्न आहे हेदेखील मी विसरून गेलो. सांगण्याचं तात्पर्य हे, की जोपर्यंत मनाचं समाधान होत नाही तोपर्यंत काम केलंच पाहिजे, तेही या कामात आकंठ बुडून.

*चाकोरीबाहेर येऊन काम केलं पाहिजे

अहमदनगरमध्ये महात्मा गांधींचं शिल्प बनवायचं होतं. मला ते शिल्प तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली. आता गांधीजींचं शिल्प म्हटलं की ते अर्धाकृती किंवा दांडीयात्रेचं, असे दोनच पर्याय सर्वांच्या समोर होते. कारण आतापर्यंत यापेक्षा वेगळे गांधीजी आपण पाहिलेच नाहीत. माझ्या मनात काही वेगळंच होतं. चाकोरीबाहेर येऊन काही तरी करायचं होतं. त्यासाठी मी त्यासाठी अभ्यास केला, वाचन केलं. ज्या जागेवर ते शिल्प बसवायचं होतं ती जागा पाहिली. कारण बऱ्याच वेळा ती जागाच आपल्याला खूप काही सांगून जाते. एक दिवस मी शिल्प कसं असेल याचं चित्र रेखाटलं; पण हे सरकारी काम असल्यामुळे त्याला मान्यता मिळाली नाही. परंतु मला चाकोरीबाहेर येऊन काम करायचं होतं, म्हणून मी माझ्या पद्धतीनं एक छोटं शिल्प तयार केलं आणि सरकारी अधिकाऱ्यांना दाखवलं. आश्चर्य म्हणजे त्यांना ते आवडलं. त्याला संमती मिळाली आणि देशातील पहिलं वेगळ्या प्रकारचं गांधीजींचं शिल्प तयार झालं. पृथ्वीवर भारताचा नकाशा आणि तो गांधीजींच्या चेहऱ्याने पूर्ण झाला आहे. गांधीजींची ओळख असलेला चरखा, तीन माकडं, दांडीयात्रा, मिठाचा सत्याग्रह या गोष्टी त्यामध्ये दाखविल्या आहेत. अशा प्रकारचं हे वेगळं असं शिल्प बनवलं गेलं. कलाकाराने नेहमी सर्जशीलता (creativity) वापरून, चाकोरीबाहेर येऊन काम केलं पाहिजे.

*कलाकारासाठी प्रशंसा हाच मोठा पुरस्कार

मला आतापर्यंत बत्तीसपेक्षा जास्त पुरस्कार मिळाले आहेत, अनेक नामवंत संस्थांची पदं मी भूषविली आहेत; परंतु एक कलाकार म्हणून काम पूर्ण झाल्यानंतर मिळणारं आत्मिक समाधान व त्या कामाबद्दल होणारी वाहवा/प्रशंसा हाच माझा खरा पुरस्कार आहे. महावीर आर्ट गॅलरी, ज्यामध्ये देशाच्या ५०० सुपुत्रांची चित्रं रेखाटली आहेत, ती पाहण्यासाठी परदेशांतूनही लेखक, पत्रकार, नागरिक येतात, हाच माझा खरा पुरस्कार आहे.

गंमत म्हणून सांगतो. काही वर्षांपूर्वी मी काही प्राण्यांची शिल्पं तयार केली होती. ज्यांनी ज्यांनी ती पाहिली त्यांनी नेहमीप्रमाणे कौतुक केलं. माझ्या स्टुडिओच्या बाहेर एका कडेला ती ठेवली होती. त्या रात्री अचानक कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज येऊ लागला. मी बाहेर जाऊन पाहिलं तर काय, पंधरा वीस कुत्री ती शिल्पं हे खरे प्राणी समजून त्यांच्यावर भुंकत होती. मला वाटतं, कुत्र्यांनी दिलेली ही प्रतिक्रिया एका पद्धतीने माझ्या कामाची पावतीच होती.

कलाकाराला प्रशंसा मिळणं हाच त्यासाठी मोठा पुरस्कार आहे. मनापासून, पूर्ण तयारीनिशी, समर्पणभाव ठेवून काम केलं की यश मिळतंच. त्यासाठी कामाची नशा येणं आवश्यक आहे.

* कलाकाराने जीवनात समाधानी होऊ नये

जेव्हा कलाकार आपल्या कामाबद्दल समाधानी होतो तेव्हा तो साचेबद्ध होतो. जिज्ञासू बनून कायम नवनवीन गोष्टींचा ध्यास घेतला पाहिजे. मी इतकी वर्षं काम करतो आहे आणि अजूनही ज्या वेळी मागे वळून पाहतो त्या वेळी काही तरी अपूर्ण आहे असं वाटतं. ते पूर्ण होण्याचा शोध मी घेतोय. माझ्या भावना त्या बाबतीत या पद्धतीने मांडता येतील

जेव्हा एखादी कलाकृती निर्माण होते तेव्हा थोड्याच वेळात जाणवतं कुणी तरी दुसरंच आपल्यामध्ये संचार करून या निर्मितीचा वाटा उचलतंय खरंच, कोणती शक्ती असेल ती? जी अमूर्तपणे माझ्याकडून अनेक कलाकृतींची निर्मिती करून घेते ... याच शोधात आता खूप कालखंड गेला, तरी उत्तर शून्यच आहे. □■



'C.C.R.T. च्या परीक्षेला ते बसले असताना जे. जे. स्टुडिओ आणि तेथील शिल्प पाहून त्यांनी ठरवलं की आपणही शिल्पकार बनायचं, आणि इथूनच त्यांचा शिल्पकलेचा प्रवास सुरू झाला.' पुढे शिल्पकारिता या अभ्यासक्रमामध्ये श्री. प्रमोद कांबळे भारतामध्ये पहिले आले.